Tipni.lwp

# सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे कार्यालय

**नवीन मध्यवर्ती इमारत, २ रा मजला, पुणे -१**

फोन नं. २०-२६१२२८४६/४७ E-mail- commcoop२०११@gmail.com

जा. क्र. गृह/डी-३/अपसेट प्राईज/आदेशिका खर्च/१४-सआ दिनांकः- १८ जून, २०१९

**विषय** :- सहकारी गृहनिर्माण फेडरेशन यांच्या अधिकाऱ्यांना वसुलीचे अधिकार प्रदान करणेबाबत.

**:: परिपत्रक ::**

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाकडील, क्र. सीएसएल-२०००/सीआर-१८४/१५-सी, दिनांक १६ एप्रिल, २००१ व क्र. सीएसएल-२७०४/सीआर-३१२/१५-सी, दिनांक २१ ऑगस्ट, २००४ च्या आदेशान्वये सहकारी गृहनिर्माण संस्थेने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ च्या वसुली प्रमाणपत्रातील थकित रक्कम वसुल करणेसाठी जिल्हा को-ऑप हौसिंग फेडरेशन लि., ठाणे व मुंबई यांच्या अधिकारी / कर्मचारी यांना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व नियम १०७ चे निबंधकाचे अधिकार प्रदान करणेबाबत अधिसूचित केले आहे. त्याप्रमाणे जिल्हा को-ऑप. हौसिंग फेडरेशनच्या अधिकारी / कर्मचारी यांना वसुलीचे अधिकार प्रदान करणेत येतात.

सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या सभासदांकडून सेवाशुल्क वसुली होऊन मिळणेबाबत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ खाली वसुलीचे प्रमाणपत्र निबंधकाकडून देण्यात येतात. त्या वसुली प्रमाणपत्रामध्ये वसुल करावयाची सेवा शुल्काची मुद्दल रक्कम, सदर रक्कमेवरील व्याज व दाव्याच्या खर्चाची रक्कम, अशा रकमेचा समावेश असतो.

या कार्यालयाचे क्र. पतसंस्था/स.आ.-५/खर्च/वसुली आदेश/२०१८, दिनांक ६.४.२०१८ चे आदेशान्वये वसुली अधिकारी यांनी वसुल करावयाच्या हुकूमनाम्याच्या / वसूली दाखल्याच्या आदेशिकेचा खर्च (cost of process) निश्चित केला आहे.

मुंबई जिल्हा को-ऑप. हौउसिंग फेडरेशन लि., मुंबई यांनी दिनांक ४.६.२०१९ च्या पत्रान्वये वसूली दाखला प्राप्त झाल्यापासून ते प्रत्यक्ष रक्कम वसूल होईपर्यंत सदर कामाकरिता मनुष्यबळ, स्टेशनरीचा खर्च, वसूली कर्मचाऱ्यांचा प्रवास खर्च, पोस्टेज खर्च, वसुली कर्मचाऱ्यांचे वेतन, टेलिफोन खर्च, इलेक्ट्रिसिटी व इतर सर्व खर्च पाहता या कार्यालयाच्या दिनांक ६.४.२०१८ च्या आदेशानुसार ठरवून दिलेल्या प्रमाणापेक्षा आदेशिकेचा खर्च जास्त होतो. त्यामुळे आदेशिकेच्या खर्चाची मर्यादा वाढ करणेची विनंती केली आहे.

या कार्यालयाच्या दिनांक ६.४.२०१८ च्या आदेशानुसार वसुली प्रमाणपत्र निबंधकाकडून निर्गमित झाल्यानंतर रक्कम वसुली करण्यासाठी येणारा खर्च, उदा. नोटीस फी, पोस्टेज, स्टेशनरी, जाहिरात खर्च व प्रवास खर्च या कारणासाठी करता येईल अशी तरतुद आहे. जिल्हा सहकारी गृहनिर्माण फेडरेशन त्यांच्या

Tipni.lwp

सभासद सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या थकित रक्कम वसुली कामासाठी वसुली अधिकारी नियुक्त करतात. सदर वसुली अधिकारी / कर्मचारी यांचा आस्थापना / प्रशासकीय खर्च सहकारी गृहनिर्माण फेडरेशनला स्वत: भागवावा लागतो. तरी संबंधित सहकारी गृहनिर्माण संस्थेला व्याजापोटी मिळणाऱ्या रकमेतून सहकारी गृहनिर्माण फेडरेशनचा उपरोक्त खर्च त्यांनी दाखल केलेल्या प्रकरणातील वसुल करावयाच्या रकमेच्या प्रमाणात जमा करुन घेऊन भागवावा. या प्रमाणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण फेडरेशनने आवश्यक ती कार्यवाही करावी.

(सतीश सोनी) 11/06/19
सहकार आयुक्त व निबंधक
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रति

१. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई व कोकण विभाग.

२. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई शहर-१,२,३,४ व ठाणे.

त्यांना कळविणेत येते की, त्यांनी त्यांचे अधिनस्त असलेल्या सर्व कार्यालयांना सदरच्या आदेशाच्या अंमलबजावणीबाबत अवगत करावे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर –**

१. मा. प्रधान सचिव (सहकार), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई – ३२.

**प्रत -**

१. अध्यक्ष, दि ठाणे जिल्हा को-ऑप. हौसिंग फेडरेशन लि., ९,विलासिनी, शिवाजी पथ, ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., समोर, ठाणे (प) – ४०० ६०१.

२. अध्यक्ष, दि मुंबई जिल्हा को-ऑप. हौसिंग फेडरेशन लि.,१०३, विकास प्रिमायसेस, पहिला मजला, ११ जी. एन. वैद्य मार्ग, फोर्ट, मुंबई -४०० ००१.